# प्रथम सत्राच्या परीक्षा घ्याव्यात

प्रतिनिधी
कोल्हापूर

- डॉ. डी. जी. कणसे समितीची विद्यापरिषदेला शिफारस
- २२ रोजी व्यवस्थापन परिषदेत अंतिम निर्णय

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने किंवा कोरोनाचा संसर्ग वाढल्यास ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, अशी शिफारस विद्यापरिषदेला डॉ. डी. जी. कणसे समितीने केली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासननियमानुसार सोमवारपासून महाविद्यालय सुरू झाली आहेत. परीक्षा अर्ज भरण्याचे विद्यापीठ प्रशासनाने आवाहनही केले. परीक्षा घ्यायच्या की नाही याबद्दल मात्र संभ्रमावस्था होती. परंतू मंगळवारी डॉ. कणसे समितीने बैठक घेऊन परीक्षा घेण्यासंदर्भात विद्या परिषदेला शिफारस केली आहे. त्यामुळे परीक्षा घ्यायची की नाही या चर्चेला पूर्ण विराम मिळाला. २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत परीक्षा कशापद्धतीने घ्यायच्या यासंदर्भात निर्णय होणार आहे. यावेळी डॉ. डी. जी. कणसे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, प्राचार्य डॉ. मेघा गुळवणी, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. ए. एम. शेख, डॉ. एस. एस. भोला, डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

**प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांनी घ्यावी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय उशिरा सुरू झाल्याने परीक्षा घेण्यासाठी खूपच कमी कालावधी मिळतो. त्यामुळे पदवी प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर घ्याव्यात. तर पदवी अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठ पातळीवर घ्याव्यात, अशी शिफारस डॉ. कणसे समितीने विद्यापरिषदेला केली आहे.

# प्रथम सत्रातील परीक्षा ऑफलाइन घेण्याची शिफारस

कोल्हापूर : महाविद्यालयाच्या प्रथम सत्र परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, कोरोनाचा संसर्ग वाढल्यास ऑनलाईन घ्याव्यात, अशी शिफारस प्राचार्य डी. जी. कणसे यांच्या समितीने विद्या परिषदेस केली आहे. आज समितीची बैठक झाली. २२ फेब्रुवारीला होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत परीक्षा कशा पद्धतीने घ्यावयाच्या याबाबतचा निर्णय होणार आहे. परीक्षा घेण्यासाठी खूप कमी कालावधी मिळतो. त्यामुळे पदवी प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात. पदवी अंतिम वर्ष परीक्षा विद्यापीठ पातळीवर घेण्याची शिफारसदेखील करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. आर के. कामत, डॉ. आर.व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

# परीक्षा महाविद्यालय पातळीवर घ्याव्यात

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदवीच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय, तर तृतीय वर्षाच्या परीक्षा शिवाजी विद्यापीठ पातळीवर घेण्यात याव्यात, अशी शिफारस प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे समितीने विद्या परिषदेला मंगळवारी केली. कोरोनाचा संसर्ग वाढल्यास प्रथम सत्राच्या परीक्षा या ऑनलाईन पद्धतीने अथवा संसर्ग न वाढल्यास ऑफलाईन स्वरूपात परीक्षा घेण्याबाबतची शिफारस या समितीने विद्या परिषदेला केली आहे.

# शिवाजी विद्यापीठात संत सेवालाल जयंती साजरी

**कोल्हापूर :** संत सेवालाल महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. व्ही. एस. मन्ने, समाजशास्त्र अधिविभागाचे प्रल्हाद माने यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक उपस्थित होते.

# परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन घेण्याबाबतची विद्यापरिषदेस शिफारस

**शिवाजी विद्यापीठातून**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम सत्राच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने किंवा कोरोनाचा संसर्ग वाढल्यास ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, अशी शिफारस प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे समितीने विद्यापरिषदेस केली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग सुरू झाले आहेत. त्याअनुषंगाने डॉ. कणसे समितीची मंगळवारी बैठक झाली. यात परीक्षा घेण्यासंदर्भात चर्चा झाली. २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत परीक्षा कशा पद्धतीने घ्यावयाच्या, याबाबतचा निर्णय होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये उशिरा सुरू झाली आहेत. परीक्षा घेण्यासाठी खूप कमी कालावधी मिळतो. त्यामुळे पदवी प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात. पदवी अंतिम वर्ष परीक्षा विद्यापीठ पातळीवर घेण्याची शिफारसदेखील करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. आर के. कामत, डॉ. आर.व्ही. गुरव आदी उपस्थित होते.